**सन २०१९-२० करिता भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) योजनेअंतर्गत मंजूर** "Improving Livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable Agriculture practices, enhancing livestock productivity, Capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government scheme" **या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र. ३४ /का-१९**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**तारीख: १३/०९/२०१९**

**संदर्भ-**

१.जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९

२.आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रिय-२०१९/प्र.क्र.६३/का.१९,दि.२९.०६.२०१९ व दि.२३.०७.२०१९

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. या योजनेतंर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी नामवंत संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी व निवड प्रक्रिया राबवून निवडक प्रस्ताव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्तावांमध्ये भारत ग्रामीण आजिविका फाऊंडेशन (BRLF) संस्थेच्या प्रस्तावाचा समावेश आहे. प्रस्ताव मुख्यत्वे नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवून शाश्वत शेती पध्दतींचा अवलंब करून १५,००० आदिवासी कुटुंबाचे जीवनमान उंचावणे या बाबत आहे.

२. नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवून व शाश्वत शेती पध्दतींचा अवलंब करून १५,००० आदिवासी कुटुंबाचे जीवनमान उंचावणे या दृष्टीकोनातून आदिवासी विकास विभागाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समिती व शासनाच्या मान्यतेने जनजाती कार्य मंत्रालय,भारत सरकार यांच्याकडे Bharat Rural Livelihoods Foundation-Improving Livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable Agriculture practices, enhancing Livestock productivity, Capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government scheme" हि योजना प्रस्तावित केली . या प्रस्तावास जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal Committee (PAC ) बैठकीमध्ये सदर योजना सन २०१९-२० व सन २०२०-२१ करिता राबविण्यासाठी एकूण २००.०० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भादिन पत्र क्र.१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. केंद्रशासनाने

वितरित केलेला निधी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आलेला आहे.

३. विदर्भातील बहुसंख्य लोकसंख्येचा शेती हा एक मुख्य आधार आहे, जिथे लहान आणि सीमांत शेतकरी जवळपास ७५% शेतकरी आहेत. या क्षेत्रामध्ये शाश्वत शेतीपद्धतींचा वापर करून अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून दारिद्र्य निर्मुलन करणे अत्यंत आवश्यक आहे. जल आणि मृदा संवर्धन तंत्रज्ञानाचा वापर करून सिंचन क्षेत्र वाढविणे तसेच योग्य पीक उत्पादन तंत्रज्ञान या बाबींचा वापर करून अल्पभूधारक शेतकऱ्यांना पूरक बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच पूरक पशुधन संगोपन करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे.

४. नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवून शाश्वत शेती पध्दतींचा अवलंब करून १५,००० आदिवासी कुटुंबाचे जीवनमान उंचावणे या दृष्टीकोनातून भारत ग्रामीण आजिविका फाऊंडेशन (BRLF) यांनी Improving Livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable agriculture practices, enhancing Livestock productivity, Capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government schemes" हा रु. २००.०० लाख किमतीचा प्रस्ताव नंदुरबार अमरावती , गोंदिया ,गडचिरोली,चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात राबविण्याबाबत शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये विदर्भातील आदिवासीबहुल तालुके व नंदुरबार जिल्ह्यातील तालुक्यात लक्ष केंद्रित करुन तेथील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्याकरिता मृदा व जल संवर्धन , कृषी उत्पादकता वाढ ,वनउपज उत्पादनाचे मूल्यवर्धन आणि पशुधन व्यवस्थापन अशा तीन महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाईल. प्रकल्पाचे इतर प्रमुख घटक म्हणजे हक्क व अधिकार याविषयी स्थानिक समुदायाची/संस्थांची क्षमता वाढवणे, विशेषत: FRA,CFR आणि TSP, मनरेगा आणि NRLM सारख्या महत्वाच्या सरकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित केले जाईल.

५ Bharat Rural Livelihood Foundation ही स्वायत्त संस्था असून सोसायटी ॲक्ट १८६० अंतर्गत नोंदणीकृत आहे. दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी केंद्रीय कॅबिनेट च्या निर्णयानुसार BRLF या संस्थेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार व BRLF यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला ज्यामध्ये भारत सरकारने रू.५०० कोटी BRLF या संस्थेला दोन टप्प्यात देण्याचे ठरविण्यात आले. त्यापैकी पहिला टप्पा २०१४ ला देण्यात आला आहे. या व्यतिरिक्त संबंधित राज्यसरकार, उद्योगक्षेत्र आणि सामाजिक संस्था यांच्याकडून निधी उपलब्ध होतो. BRLF ही संस्था संपूर्ण भारतभर काम करीत असून त्यांचे मुख्य लक्ष्य मध्यभारतातील आदिवासी भागात काम करणे. २० % पेक्षा जास्त आदिवासी संख्या असलेल्या विविध राज्यातील जसे- ओरिसा,झारखंड,पश्चिम बंगाल,छत्तीसगढ,मध्यप्रदेश,आंध्रप्रदेश , तेलंगाना,मध्यप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात या मधील १९० जिल्ह्यात १०७७ तालुक्यात काम करीत आहेत.

६. सबब, भारतीय संविधान २७५ (१) कार्यक्रमातंर्गत मंजूर "Bharat Rural Livelihoods Foundation-Improving Livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable agri practices, enhancing Livestock productivity, Capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government scheme" हि योजना आदिवासी विकास विभाग व भारत ग्रामीण आजिविका

फाऊंडेशन (BRLF) या संस्थेमार्फत संयुक्तपणे राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय-</u>**

नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवून सुधारित तंत्रज्ञान व शाश्वत शेती पध्दतींचा अवलंब करून १५,००० आदिवासी कुटुंबाचे जीवनमान उंचावणे, निर्धारित केलेल्या भागात जमीन आणि जल संसाधने विकसित करणे व ग्रामसभा / पंचायत राज संस्थाचे सक्षमीकरण करणे व ग्रामीण विकास प्रक्रिया चालविणे व त्यांचे हक्क मिळवून देण्यास मार्गदर्शन करणे या कार्यक्रमार्तगत “Bharat Rural Livelihoods Foundation-Improving Livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable agri practices, enhancing Livestock productivity, Capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government scheme” ही योजना आदिवासी विकास विभाग व भारत ग्रामीण आजिविका फाऊंडेशन (BRLF)यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु.२००.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक-१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास नाशिक,यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३२२३९१८७६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.09.16 18:18:39 +05'30'

**( संतोष जाधव )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत,**

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहायक मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५) व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक
६) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक, ठाणे, अमरावती,नागपूर .
८) संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,

९) संबंधित गटविकास अधिकारी,पंचायत समिती

१०) संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक,आ.वि.महामंडळ

११) सबंधित जिल्हा /तालुका कृषी अधिकारी

१२) प्रतिनिधी, भारत ग्रामीण आजिविका फाऊंडेशन (BRLF)

१३) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

१४) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

## भारतीय संविधान अनुच्छेद २७५(१) योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये मंजूर योजना

### परिशिष्ट-१

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>“Bharat Rural Livelihoods Foundation-Improving Livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable Agriculture practices, enhancing Livestock productivity, Capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government scheme”</td></tr>
<tr><td>२.</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर,अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग,अमरावती व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक अंतर्गत अनुसूचित जमातीचे १५००० कुटुंब लाभार्थी. यापैकी ७५०० कुटुंबाना आदिवासी विकास विभागामार्फ़त लाभ देण्यात येईल तर उर्वरित कुटुंबाना BRLF संस्थेमार्फ़त लाभ देण्यात येईल.<br>विस्तृत लाभक्षेत्र खालीलप्रमाणे-
<table>
<tr><th>S.No.</th><th>जिल्हा</th><th>तालुका</th><th>लाभार्थी कुटुंबांची संख्या</th><th colspan="2">निधीचा स्रोत</th></tr>
<tr><td>१</td><td>नंदुरबार</td><td>धडगाव</td><td>२५००</td><td>--</td><td>BRLF</td></tr>
<tr><td>२</td><td>अमरावती</td><td>चिखलदरा</td><td>२५००</td><td>--</td><td>BRLF</td></tr>
<tr><td>३</td><td>गोंदिया</td><td>देवरी</td><td>२५००</td><td>TDD</td><td>--</td></tr>
<tr><td>४</td><td>गडचिरोली</td><td>एटापल्ली</td><td>२५००</td><td>TDD</td><td>--</td></tr>
<tr><td>५</td><td>चंद्रपूर</td><td>चिमूर</td><td>२५००</td><td>--</td><td>BRLF</td></tr>
<tr><td>६</td><td>यवतमाळ</td><td>पांढरकवडा</td><td>२५००</td><td>TDD</td><td>--</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>१५,०००</td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३.</td><td>वित्तीय तरतूद</td><td>सन २०१९-२० व २०२०-२१ करिता भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजुर निधी रू.२००.०० लक्ष</td></tr>
<tr><td>४.</td><td>योजना राबविणारी यंत्रणा</td><td>Bharat Rural Livelihoods FoundationNew Delhi, (BRLF)</td></tr>
<tr><td>५.</td><td>अंमलबजावणी अधिकारी</td><td>संबंधित प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प</td></tr>
<tr><td>६.</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक</td></tr>
<tr><td>७</td><td>योजनेचा उद्देश/हेतू</td><td>➢ या प्रकल्पाचा मुख्य उद्देश नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवून शाश्वत शेती पध्दतींचा अवलंब करून १५,००० आदिवासी कुटुंबांचे जीवनमान उंचावणे. निर्धारित केलेल्या भागात जमीन आणि जल संसाधने विकसित करणे.<br>➢ सुधारित आणि शास्वत शेतीपद्धतींचा वापर करणे.<br>➢ सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून पशुधन उत्पादकता वाढविणे.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | ➢ कमीतकमी खर्चात कीटकनाशकविरहित शेती तंत्राचा वापर करणे व त्या भागातील उपयुक्त अशा पिकांचा विचार करून उत्पादन घेणे.<br>➢ ग्रामीण संस्थांची लोकशाही प्रक्रिया सुधारत असताना ग्रामसभा पंचायत / राज संस्थाचे सक्षमीकरण करणे व ग्रामीण विकास प्रक्रिया चालविणे व त्यांचे हक्क मिळवून देण्यास मार्गदर्शन करणे |
| ८. | **योजना अंमलबजावणीची कार्यपद्धती** | १. सदर योजनेमध्ये विदर्भातील आदिवासीबहुल तालुके व नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात लक्ष केंद्रित करुन तेथील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्याकरिता मृदा व जल संवर्धन, कृषी उत्पादकता वाढ, वनउपज उत्पादनाचे मूल्यवर्धन आणि पशुधन व्यवस्थापन अशा तीन महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाईल.<br>२. प्रकल्पाचे इतर प्रमुख घटक म्हणजे हक्क व अधिकार याविषयी स्थानिक समुदायाची/संस्थांची क्षमता वाढवणे, विशेषत: FRA, CFR आणि TSP, मनरेगा आणि NRLM सारख्या महत्वाच्या सरकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित केले जाईल.<br>३. योजना राबविण्याची कार्य पद्धती खालील प्रमाणे असेल-<br>१) सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने भारत ग्रामीण आजिविका फाऊंडेशन (BRLF) हि संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल.<br>२) व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेशी या योजनेसंबंधी सामंजस्य करार करतील व मंजुर तरतुदीच्या मर्यादेत प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचारविनिमय करून अंतिम करतील.<br>३) योजनेच्या अनुषंगाने ५ आदिवासी बहुल तालुक्यांमधून १५,००० लाभार्थींची निवड केली जाईल. सदर कार्यक्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासनास असतील.<br>४) गावांची निवड करताना पेसा अतर्गत गावे व वनहक्क कायद्याअंतर्गत जमीन प्राप्त झालेल्या गावांना प्राधान्य देण्यात यावे.<br>५) व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेसोबत सामंजस्य करार करून कार्यारंभ आदेश करतील.<br>६) प्रत्येक गावांमधून लाभार्थी शेतकऱ्यांची निवड अंमलबजावणी यंत्रणा करेल.<br>७) गावांची व लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेनी गावांची यादी व लाभार्थ्याची यादी संबंधित प्रकल्प अधिकारी यांना मान्यतेसाठी सादर करतील.<br>८. लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा .<br>९. तसेच वनपट्टा धारक लाभार्थी, आदिम जमाती/पारधी, महिला शेतकरी यांचा समावेश असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात यावे.<br>१०. योजनेमध्ये खालीलप्रमाणे बाबी अंतर्भूत आहेत:-<br>(१) १५००० कुटुंबांचे वार्षिक उत्पन्नात वाढ करणे:<br>१.१ निर्धारित क्षेत्रातील जमीन आणि जलस्रोत वाढवणे<br>i) अंदाजे ४८०० हे. कोरडवाहू जमीन ओलिताखाली आणून दुहेरी पिक घेता येईल<br>ii) अंदाजीत ७००० कुटुंबाना या उपाययोजनेचा फायदा मिळेल. |

| | | |
|---|---|---|
| | | iii) निवड केलेल्या तालुक्यांची Cropping Intensity वाढेल.<br>१.२ कृषी उत्पन्नात वाढ करणे -<br>i) कमीतकमी ६००० निर्धारित आदिवासी कुटुंब सुधारित आणि शास्वत शेती तंत्राचा वापर अन्नधान्य व भाजीपाला उत्पादन करण्याकरिता करतील. यामध्ये महिला शेतकऱ्यांना विशेष प्राधान्य देण्यात येईल.<br>ii) निर्धारित कुटुंबांचे शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करण्यात येईल.<br>iii) फळ आणि भाजीपाला आधारित सुधारित तंत्रज्ञानाचा कमीतकमी १००० कुटुंबाना फायदा होईल.<br>iv) पिके एकत्रित करणे तसेच मुल्यवर्धनाचा फायदा बाजारपेठेत मिळेल.<br>१.३ उत्कृष्ट पशुधन व्यवस्थापनासाठी समुदाय सदस्यांची क्षमता वाढवणे-<br>i) २००० कुटुंबे पशुधन आधारित सुधारित तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतील व वापर करतील.<br>१.४ वनउपज उत्पादनांची Value chain प्रस्थापित करणे-<br>i) वनउपज आधारित Value chain तयार करण्याकरिता २००० कुटुंबाना प्रशिक्षित करणे जसे- वर्गीकरण,प्रतवारी करणे, एकत्रित करणे,विपणन इ.<br>(२) ग्रामीण संस्थांची लोकशाही प्रक्रिया सुधारत असताना ग्रामसभा / पंचायत राज संस्थाचे सक्षमीकरण करणे व ग्रामीण विकास प्रक्रिया चालविणे व त्यांचे हक्क मिळवून देण्यास मार्गदर्शन करणे:-<br>२.१ अधिकार आणि हक्कांच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी समुदाय संस्थांची क्षमता बांधणी करणे-<br>i) निवडक CSO कर्मचारी, ग्रामसंघ, पंचायत राज संस्था, तालुका प्रशासन यांना उपजीविका वाढ कार्यक्रमांच्या विविध घटकांवर प्रशिक्षण दिले जाईल.<br>ii) एक आदिवासी संसाधन केंद्र स्थापन केले जाईल आणि ते गाव संस्थांच्या क्षमता बांधणीकरिता मार्गदर्शन करेल.<br>iii) एकंदरीत ३० ग्रामसभांना त्यांच्या अधिकार आणि हक्कांबाबत प्रशिक्षित केले जाईल आणि त्यांचे सक्षमीकरण करण्यात येईल. |
| ९. | **योजना अंमलबजावणी समिती व सनियंत्रण-मूल्यमापन समिती** | ➢ योजनेचे अंमलबजावणी करीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे<br>१. संबंधित प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास - अध्यक्ष<br>२. संबंधित गटविकास अधिकारी,पंचायत समिती - सदस्य<br>२.संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक,आ.वि.महामंडळ - सदस्य<br>३. सबंधित तालुका कृषी अधिकारी -सदस्य<br>४ . BRLF चे स्थानिक संस्थेचा प्रतिनिधी - सदस्य<br>५.सहायक प्रकल्प अधिकारी (विकास), ए.आ.वि.प्र -सदस्य सचिव<br>➢ योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील<br>➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर महीन्याला आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर |

| | | |
|---|---|---|
| | | त्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.<br>➢ योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन करण्याकरिता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:<br>१.व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक - अध्यक्ष<br>२.संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग - सदस्य<br>३. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद - सदस्य<br>४.संबंधित प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास विभाग - सदस्य<br>५. नामनिर्देशित कृषी विषयातील तज्ञ (३) - निमंत्रित सदस्य<br>६. संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक,आ.वि.महामंडळ - सदस्य<br>७..BRLF यांचे प्रतिनिधी - सदस्य<br>८.महाव्यवस्थापक(प्रशासन),म.रा.आ.वि.म,नाशिक - सदस्य सचिव<br><br>➢ सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार उपरोक्त समितीस राहतील.<br>➢ उपरोक्त समितीमार्फत झालेल्या कामाचा वेळोवेळी आढावा घेतला जाईल.<br>➢ योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महिन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमलबजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.समितीमध्ये आवश्यकतेप्रमाणे इतर तज्ञ/संस्था यांना निमंत्रित करता येईल. |
| १०. | **योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी** | सदर प्रकल्पाचा कालावधी दोन वर्षाचा असेल. |
| ११. | **निधी वितरणाची कार्यपद्धती** | • एकूण मंजूर निधी २००.०० लक्ष<br>• शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेसोबत सामंजस्य करार करतील व कार्यारंभ आदेश देऊन प्रकल्पासाठी पहिल्या वर्षासाठी मंजूर रकमेतून ५०% रक्कम अदा करण्यात येईल.<br>• सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल.<br>• प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ०६ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर पहिल्या वर्षासाठीचा पुढील ५०% निधी वर्ग करण्यात येईल.<br>• योजनेच्या अनुषंगाने दुसऱ्या वर्षाच्या मंजूर निधीच्या ४० टक्के निधी दुसऱ्या वर्षाची अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वी तसेच प्रथम वर्षी केलेल्या कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार वर्ग करण्यात येईल.<br>• दुसऱ्या वर्षीचा पुढील ४० टक्के निधी ६ महिने पूर्ण झाल्यानंतर कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार वर्ग करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | • दुसऱ्या वर्षासाठी मंजूर झालेल्या निधीतून उर्वरित २० टक्के निधी योजना यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर तसेच योजना पूर्ण झाल्याचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अभिप्रायानुसार अंमलबजावणी यंत्रणेस वर्ग केला जाईल.<br>• योजनेच्या टप्प्यानुसार झालेल्या कामाचे अहवाल सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>• योजनेसाठीच्या एकुण प्रस्तावित खर्चापैकी निधीपैकी २% निधी तसेच प्रकल्पातील शिल्लक निधी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांचे स्तरावर ठेवून हा निधी योजना सनियंत्रण व मूल्यमापन करण्यास वापरता येईल. |
| १२. | **योजनेच्या अटी व शर्ती** | १.निवडलेल्या तालुके/गावामध्ये योजनेत समाविष्ट असलेले सर्व उपक्रम व्यवस्थित तसेच विहित कालमर्यादेत राबविले जावेत या करिता अंमलबजावणी यंत्रणा हे पूर्णतः जबाबदार राहतील.<br>२.अंमलबजावणी यंत्रणेने सामंजस्य करारामध्ये सविस्तरपणे नमूद अटी व शर्तीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक असेल.<br>३.प्रकल्पाची अंमलबजावणी करताना व योजना पूर्ण झाल्यावर चांगल्या प्रतीच्या चित्रफिती, छायाचित्रे व फलनिष्पत्ती अहवाल यासह परिपूर्ण अहवाल अंमलबजावणी संस्थेने आदिवासी विकास विभागास सादर करावा व यशोगाथा राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध करण्यात यावी.<br>४.जे तालुके/गावामध्ये सदरचा उपक्रम राबविला जाईल तेथे महाराष्ट्र शासन , आदिवासी विकास विभागाद्वारे भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत कार्यक्रम अशा आशयाचे फलक लावण्यात यावेत.सर्व प्रसिद्धी पत्रकावर अर्थ सहाय्य -आदिवासी विकास विभाग असे लिहावे.<br>५.योजनेस अर्थ सहाय्य प्राप्त झाल्यापासून २ वर्षात योजनेची पूर्णपणे अंमलबजावणी करणे अंमलबजावणी संस्थेस बंधनकारक राहील. परंतु नैसर्गिक आपत्ती, अपरिहार्य कारणे तथा परिस्थितीनुसार प्रकल्पाच्या यशस्वी पूर्णत्वासाठी सदर कालावधीमध्ये वाढ करण्यास शासनाची मंजुरी घ्यावी लागेल.<br>७.सदर प्रकल्पाच्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) अंमलबजावणी संस्थेने व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक व आयुक्त,आदिवासी विकास विभाग,नाशिक यांना सादर करणे बंधनकारक राहील.<br>८. सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील.<br>९. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल. |

| | | |
|---|---|---|
| १३. | **योजनेची फलनिष्पत्ती** | योजनेच्या फलनिष्पत्तीमध्ये खालीलप्रमाणे बाबी अंतर्भूत आहेत :-<br>(१) १५००० कुटुंबांचे वार्षिक उत्पन्नात वाढ होईल.<br>१.१ निर्धारित क्षेत्रातील जमीन आणि जलस्रोत वाढवणे<br>१.२ कृषी उत्पन्नात वाढ करणे<br>१.३ उत्कृष्ट पशुधन व्यवस्थापनासाठी समुदाय सदस्यांची क्षमता वाढवणे<br>१.४ वनउपज उत्पादनांची Value chain प्रस्थापित करणे-<br>(२) ग्रामीण संस्थांची लोकशाही प्रक्रिया सुधारत असताना ग्रामसभा / पंचायत राज संस्थाचे सक्षमीकरण करणे व ग्रामीण विकास प्रक्रिया चालविणे व त्यांचे हक्क मिळवून देण्यास मार्गदर्शन करणे<br>२.१ अधिकार आणि हक्कांच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी समुदाय संस्थांची क्षमता बांधणी करणे |